आर. एन. आय. ३७४७३/८० विनातिकीट परवाना क्र. के. एल.आर. ७४/२०१८-२०

# ग्रहण काळात अंधश्रध्दा पाळू नये : डॉ. मिलिंद कारंजकर

कोल्हापूर, ता. २ : पाच जून ते पाच जुलै या काळात तीन ग्रहणांचा दुर्मिळ योग आला असून पाच जूनला चंद्रग्रहण तर २१ जून रोजी सूर्यग्रहण व पाच जुलैला परत चंद्रग्रहण होणार आहे. या तीन ग्रहणांपैकी पाच जूनचे चंद्रग्रहण व २१ जूनला होणारे सूर्यग्रहण भारतामधून दिसणार आहे. मात्र, पाच जुलैला होणारे चंद्रग्रहण भारतामधून दिसणार नाही आणि या काळात अंधश्रध्दा पाळू नये, असे आवाहन करत ही माहिती विवेकानंद कॉलेजच्या पदार्थविज्ञान व खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली.

पाच जूनला होणाऱ्या ग्रहणाची सुरुवात रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी होणार असून ते सहा जूनच्या पहाटे दोन वाजून ३४ मिनिटांनी संपणार आहे. हे ग्रहण हे छाया कल्प प्रकारचे आहे. २१ जूनला होणारे सूर्यग्रहण हे सकाळी दहा वाजून तीन मिनिटांनी सुरु होणार असून एक वाजून २८ मिनिटांनी संपणार आहे. या ग्रहणाचा कालावधी तीन तास पंचवीस मिनिटे व २९ सेकंद एवढा असणार आहे. पाच जुलैला होणारे छायाकल्प चंद्रग्रहण सकाळी आठ वाजून ३७ मिनीटांनी सुरु होणार आहे.